# भारतातील बेरोजगारीची समस्या

**डॉ. प्रबोधकुमार एम. सातपुते**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, समुद्रपुर.
Mob. No. - 9420062386
Email Id -
probodhsatpute@gmail.com

---

***सारांश :***

*भारतासमोर असणाऱ्या अनेक समस्यांपैकी एक समस्या म्हणजे बेरोजगारी होय. बेरोजगारी ही एक दीर्घकालीन सामाजिक, आर्थिक समस्या होय. देशामध्ये वाढत जाणारी लोकसंख्या, औद्योगीकरणाचा आभाव, शैक्षणिक उनिवा ,आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव इत्यादी अनेक कारणे या समस्येला जन्म देण्यास कारणीभूत आहे. या संशोधन पेपर मध्ये बेरोजगारीची कारणे ,प्रकार ,परिणाम व उपाय योजना यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

---

**प्रस्तावना :**

भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये बेकारीची समस्या आजही एवढ्या वर्षांनंतर एक प्रमुख समस्या म्हणून उभी आहे. या देशातील बेकारीची समस्या ही औद्योगिक दृष्ट्या विकसित असणाऱ्या देशांपेक्षा भिन्न आहे काम मागणाऱ्यांना जेव्हा देशात काम मिळत नाही अशा अवस्थेला बेरोजगारी बेरोजगारी म्हणतात .भारतामध्ये प्रचलित असणाऱ्या मजुरी दराला लोक काम करण्यास तयार असताना देखील त्यांना काम मिळत नाही अशा प्रकारची बेकारी प्रामुख्याने भारतामध्ये दिसून येते .उच्च शिक्षण घेऊनही त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार प्राप्त होत नाही त्याचा परिणाम म्हणजे समाजामध्ये असंतोष ,नैराश्य, अस्थिरता वाढताना दिसून येते अशा प्रकारची समस्या ही व्यक्तिगत समस्या नाही तर राष्ट्रीय स्तरावर देखील परिणाम करणारे असतात.

**संशोधनाचा उद्देश :**

- भारतातील बेकारीच्या समस्येचे मूल्यांकन करणे.
- बेकारीच्या समस्येची कारणे शोधणे.

- बेकारीचे समाजावर कसे परिणाम होतात.
- उपाययोजना सुचविने.

भारतातील बेकारीचे स्वरूप :

भारतातील बेकारीचा अभ्यास करत असताना प्रामुख्याने भारतातील बेकारी दोन स्वरूपात विभागता येते.

1. ग्रामीण बेकारी

2. शहरी बेकारी.

**अ. ग्रामीण बेकारी :**

भारतामध्ये ग्रामीण बेकारीची समस्या फारच तीव्र असलेली दिसून येते .भारताच्या ग्रामीण भागात प्रामुख्याने दोन प्रकारची बेकारी आढळून येते.

**1. हंगामी/ मोसमी बेरोजगार :**

भारतात शेतीचे स्वरूप हंगामी स्वरूपाचे आहे जरी भारतात शेतीला मुख्य व्यवसाय मांनला तरी पण शेती व्यवसाय हंगामी स्वरूपाचा आहे .भारतामध्ये शेती करिता पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे दुबार पीक घेता येत नाही .शेती व्यवसायातील रोजगार ,शेतीचा हंगाम ,शेती करण्याची पद्धत ,जमिनीचा कस या बाबीवर हा व्यवसाय अवलंबून असतो .भारतामध्ये सिंचनाच्या पुरेशा सुविधा ही उपलब्ध नसल्यामुळे दुबार पिके घेता येत नाही त्यामुळे भारतातील श्रमिकांना पाच ते सहा महिने बेकार राहावे लागते. तसेच अलीकडच्या काळात शेतीचा आकार लहान झाल्यामुळे व मजुरांची संख्या अधिक असल्यामुळे देखील हंगामी बेरोजगारीत वाढ झालेली दिसून येते.

**2. छुपी बेरोजगारी/ प्रच्छन्न बेरोजगारी :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये छुपी बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते आपणाला शेतावर अनेक मजूर तसेच स्वतः शेतकरी देखील काम करताना दिसून येतात परंतु प्रत्यक्षात त्यांच्या कामामुळे उत्पादनात कुठलीच वाढ झालेली दिसून येत नाही उत्पादनातील वाढ ही शून्य असते त्यामुळे प्रत्यक्षात जरी काम करीत असले तरी ते लोक बेकार असतात अशा श्रमिकांनी काम जरी केले नाही तरी एकूण उत्पादनात घट होणार नाही असे मजूर बेकार असतात .या प्रकारच्या बेकारीला छुपी बेकारी म्हणतात.

**ब. शहरी बेरोजगारी :**

शहरी भागातील बेरोजगारी हे ग्रामीण भागातील बेरोजगारीपेक्षा थोडी भिन्न स्वरूपाची असते. शहरी

भागात लोकांना राहण्यासाठी पुरेशा सोई उपलब्ध नसतात त्यामुळे बेरोजगार गलिच्छ वस्तीमध्ये राहताना दिसून येतात त्यामुळे सामाजिक संघर्षात वाढ होऊन सामाजिक असुरक्षितता दिसून येते शहरी भागात प्रामुख्याने दोन प्रकारची बेरोजगारी आढळून येते.

1. **औद्योगिक बेरोजगारी :**

औद्योगिक बेरोजगारी म्हणजे अशी स्थिती होय की जेथे औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करताना लोकांना त्यांचे कौशल्य असून देखील काम मिळत नाही अशा प्रकारची विकारी ही प्रामुख्याने औद्योगिक शहरांमध्ये कंपन्यांमध्ये मंदी तांत्रिक प्रगती किंवा कामगार कपात यामुळे उद्भवताना दिसून येते भारतातील लोकसंख्या वाढीचा दर अधिक असल्यामुळे काम मागणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे त्यामुळे ग्रामीण भागात काम उपलब्ध होत नसल्यामुळे श्रमिक शहरांकडे स्थलांतरित होत आहे त्यांचा एकमेव उद्देश म्हणजे रोजगार प्राप्त करणे परंतु भारतात औद्योगीकरणाचा वेग मंद असल्यामुळे पुरेशा प्रमाणात रोजगारीच्या संधी उपलब्ध नाही त्यामुळे औद्योगिक बेकारी वाढत आहे.

2. **सुशिक्षिकांची बेकारी :**

भारतातील शहरी भागात सुशिक्षितांची बेकारी मोठ्या प्रमाणात आढळून येते." शिक्षण म्हणजे उज्वल भविष्याची गुरुकिल्ली "असे म्हणतात परंतु आज सुशिक्षिकांची बेकारी ही प्रामुख्याने वाढताना दिसते ज्यांनी पदवी, पदव्युत्तर शिक्षण किंवा इतर स्वरूपाचे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे तरी पण त्यांच्या अनुरूप इच्छित नोकरी मिळत नाही. बहुजन समाजातील

क्रांतीकारक पेटण्यासाठी असमाधानाची बाब पुरेशी आहे.. भारतात शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे त्यामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

**बेरोजगारीची कारणे :**

**1. लोकसंख्येतील वाढ :**

बेरोजगारीच्या कारणांमध्ये लोकसंख्या वाढ हे एक महत्त्वाची कारण आहे 1921 पासून भारताची लोकसंख्या सतत वाढत आहे लोकसंख्या वाढीसाठी 2.5% वाढ गृहीत पकडल्यास दरवर्षी श्रमिकांच्या संख्येत 40 दशलक्ष श्रमिकांची भर पडते एवढ्या मोठ्या वाढत्या लोकसंख्येला पुरेल एवढा रोजगार पुरविणे अशक्य.

**2. वर्तमान शिक्षण प्रणाली :**

भारतातील शिक्षण प्रणाली ही सदोष आहे.या शिक्षण पद्धतीमध्ये व्यावसायिक शिक्षणाची पुरेशी व्यवस्था नाही इंग्रजांच्या काळातील मेकाले यांनी सुरू केलेल्या शिक्षण पद्धतीत वर्तमान काळात फारसे

बदल झालेले नाही देशातील शाळा महाविद्यालयातील लाखो विद्यार्थी उत्तीर्ण होतात परंतु काम शोधणारे आणि कामाच्या संधी यातील दरी सतत वाढतच आहे. व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे हे तरुण स्वयंरोजगाराकडे वळत नाही.

**3. अपुरा औद्योगिक विकास :**

विकसित देशाच्या तुलनेत भारतातील औद्योगिक वृद्धीचा दर कमी आहे भारतात विशिष्ट भागातच उद्योग केंद्रित झालेले दिसून येतात त्यामुळे अपेक्षित प्रमाणात औद्योगिक विकास न झाल्यामुळे बेकारीची समस्या वाढलेली दिसून येते.

**4. श्रमिकांची कमी गतीक्षमता :**

भारतातील श्रमिक आपले गाव ,कुटुंब सोडून दुसऱ्या गावी जाण्यास तयार होत नाही अंकुशल श्रमिक दुसऱ्या गावात स्थलांतरित झाल्यास त्यांना भाषा, धर्म इत्यादी नवीन असल्यामुळे ते त्या ठिकाणी जाण्यास तयार नसतात अशा प्रकारे श्रमिकांच्या कमी गतीक्षेमुळै बेरोजगारीत वाढ होते.

**5. शेतीचा मागासलेपणा :**

भारतीय शेतीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात वाढले आहेत .तसेच जुनाट उत्पादन तंत्राचा वापर शेतीमध्ये होत असल्यामुळे, सुधारणांचा अवलंब न केल्यामुळे देखील बेकारी वाढताना दिसते.

**6. कुटिर उद्योग आणि हस्त व्यवसायांचा ऱ्हास :**

भारताचा ग्रामीण भागात शेती सोबतच कुटिर उद्योग व हस्तव्यवसायावर देखील काही लोक अवलंबून आहेत परंतु कुटिर उद्योगाला उतरती कळा लागली असल्यामुळे व इतर पर्यायी उद्योग उपलब्ध नाही त्यामुळे देखील भारतामध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.

**बेरोजगारीचे दुष्परिणाम :**

1. **राष्ट्रीय उत्पादनात घट:**

जेव्हा देशातील लोक बेरोजगार असतात तेव्हा देशाचे राष्ट्रीय उत्पादनात घट होत असते म्हणजेच देशाचा जीडीपी कमी होत असतो.

**2. कर संकलन कमी होते :**

लोकांना काम नसल्यामुळे त्यांना उत्पन्न मिळत नाही त्यामुळे त्यांचे कर भरण्याची शक्यता कमी असते त्यामुळे कर संकलन कमी होते.

3. लोकांना जर का मिळत नसेल तर त्यांच्यामध्ये नैराश्य वाढते त्याला रोजगार नसल्यामुळे अनेक व्यसने लागू शकतात.

**4. गुन्हेगारीत वाढ :**

बरेच तरुण रोजगार मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असतात त्यांनी शिक्षणासाठी कर्ज घेतलेले आहे जर तरुणांना नोकरी मिळाली नाही तर ते कर्जाची परतफेड करू शकत नाही त्यामुळे ते वाम मार्गाने पैसा मिळण्याचा प्रयत्न करतात व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते.

**5. आरोग्यावर परिणाम :**

अधिक शिक्षण घेऊनही जर रोजगार मिळत नसेल तर त्याच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होतो.श्रमिकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

6. **आर्थिक विषमतेत वाढ :**

भारतात अगोदरच मोठ्या प्रमाणात विषमता आहे इतर लोकांना रोजगार मिळत नसेल तर त्यांचे उत्पन्न वाढणार नाही त्यामुळे पुन्हा मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता वाढून त्यात प्रचंड दरी निर्माण होते.

**बेरोजगारी दूर करण्याच्या उपाययोजना :**

1. **शिक्षण प्रणालीत सुधारणा करण्यावर भर :**

मेकाले प्रणित शिक्षण प्रणाली ही कुचकामी व अनुपयुक्त ठरली असता केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यावसायिक व कौशल्याधारित शिक्षण देणे आवश्यक आहे त्यामुळे विद्यार्थी हा रोजगार मिळण्यास सक्षम ठरू शकतो तसेच त्या विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार करण्याकरिता प्रवृत्त करण्याकरिता भर देण्यात यावा .तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकरिता कर्ज ,सवलती व मार्गदर्शन देण्यात यावे .मुद्रा योजना ,स्टार्टअप इंडिया यासारख्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात यावा.

**2. कृषी क्षेत्रातील रोजगार :**

शेती व्यवसाय सोबत दुग्ध व्यवसाय, मधमाशी पालन ,कुक्कुटपालन इत्यादी वाढविण्याचा प्रयत्न करायला पाहिजे ग्रामीण भागात अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यास प्राधान्य देण्यात यावे.

**3. आय. टि. क्षेत्रात संधी :**

आजच्या काळात तरुणांना कोडींग, डिजिटल मार्केटिंग ,ग्राफिक डिझाईन यासारखी डिजिटल कौशल्य शिकविण्याची गरज आहे अशा तरुणांना आयटी क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध आहेत.

**4. लोकसंख्येवर नियंत्रण :**

भारताची लोकसंख्या ही सतत वाढत आहे या वाढत्या लोकसंख्येला आळा घालते आवश्यक आहे याकरिता जनजागृती चे कार्यक्रम राबविण्याची गरज आहे यामुळे बेरोजगारीवर दीर्घकालीन परिणाम होईल.

**5. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी :**

तरुणांसाठी ज्या शासकीय योजना आहेत त्या योजनांची माहिती खऱ्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे याकरिता स्थानिक प्रशासन ,एनजीओ यांच्या मदतीने या योजनांची व्यापकता वाढू शकते.

**6. गुंतवणुकीला प्रोत्साहन :**

देशांमध्ये विदेशी तथा देशी गुंतवणूकदारांना आकर्षित करून उद्योग उभारणीला प्राधान्य द्यायला पाहिजे जेणेकरून रोजगारामध्ये वाढ घडून येईल व बेरोजगारी कमी होईल तसेच मेक इन इंडिया योजनेला गती मिळेल.

**निष्कर्ष :**

भारतातील बेरोजगारी एक वैयक्तिक समस्या नाही तर ती राष्ट्रीय समस्या बनली तसेच ती आर्थिक समस्या देखील नसून ती सामाजिक, मानसिक आणि राजकीय विकासाशी संबंधित फार मोठी अडचण आहे. देशातील तरुण मोठ्या प्रमाणात बेकार आहेत शिक्षण आणि रोजगारातील तफावत तसेच उद्योगधंद्याची कमतरता या कारणामुळे बेरोजगारी वाढलेली दिसून येते शासनाने यावर योग्य उपाय योजना करणे आवश्यक आहे अन्यथा ही समस्या अधिक गंभीर बनू शकते .शिक्षण व्यवस्था रोजगाराभिमुख असायला पाहिजे तसेच रोजगाराच्या ज्या योजना आहेत त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

एकंदरी शिक्षण ,कौशल्य, रोजगार व उद्योग यामध्ये समन्वय निर्माण करूनच या समस्येवर मात करता येईल याकरिता सरकार आणि समाज मिळून एकत्रित काम करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


- भारतीय अर्थव्यवस्था . डॉ.सुधाकर शास्त्री
- भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र - डॉ.जी एन झामरे पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर
- भारतीय अर्थव्यवस्था एक अभ्यास - प्रदीप जैन.
- Niti aayog reports.
- Macroeconomics theory and policy -Dr.H.L.Ahuja. S. Chand and company ltd.New.Delhi